**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ७९३/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री.अशोक बाळु गवाळे,
मु.वडवली पो. उचाट,
ता.वाडा, जि.पालघर ४२१ ३१२.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय वडवली, ता.वाडा,
जि.पालघर ४२१३१२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय वडवली, ता.वाडा,
जि.पालघर ४२१३१२.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १३/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १/११/२०२१ | ---- | १३/१२/२०२१ | १०/१/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२९/३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १३/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एकनाथ दत्तु मेरे, ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वडवली उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *ग्रामपंचायत कार्यालयामधील नमुना नोंदवहयाची छायांकित प्रती मिळणेबाबत व इतर माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१०/१/२०२२ रोजी, "*श्री.अशोक बाळु गवाळे रा.वडवली यांनी दि.१३/१२/२०२१ केलेल्या अपिलाची माहिती ग्रा.पं. ग्रामनिधी मधील नमुना नं.५, ५/क, ६, ७, ८,९,९/क,१०,११,१२,१३,१४ व १५ या सर्व नोंदी छायांकित प्रती दिनांक ३१/१/२०२२ अखेर विनामुल्य माहिती अपिलार्थी यांना ग्रामसेवक वडवली यांनी देण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, अद्यापपर्यंत तक्रारकर्ता यांना माहिती दिली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात जलद टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.एकनाथ दत्तु मेरे, ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वडवली यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२९/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.एकनाथ दत्तु मेरे,
ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वडवली
ता.वाडा, जि.पालघर ४२१३१२.